**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०५.**

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०५/०६/२५२१८८८/२५२१८९०
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./आस्था/५३९/१७
दिनांक :- २४/०८/२०१७

## - जाहिर सुचना -

**महानगरपालिकेच्या क्रीडा विभागासाठी क्रीडा विभागाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त राज्य शासकीय क्रीडा अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

महानगरपालिकेतील क्रीडा विभागासाठी क्रीडा विभागाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त राज्य शासकीय क्रीडा अधिकाऱ्याची वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, विरार येथे करारपध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी इच्छुक सेवानिवृत्त क्रीडा अधिकाऱ्याकडून सदर पदाकरिता अर्ज दिनांक ११/०९/२०१७ पर्यंत मा.आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका मुख्यालय विरार, विरार (पुर्व) ता.वसई, जि.पालघर या पत्त्यावर मागविण्यात येत आहेत

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण- २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार करण्यात येणार आहे.याबाबतची अधिक माहिती वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संकेतस्थळ http://vvcmc.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून अर्ज करावेत.

जावक क्र.वविशम/आस्था/५३९/१७
दिनांक २४/०८/२०१७

उप-आयुक्त (आस्थापना)
वसई - विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner

34/५

# वसई - विरार शहर महानगरपालिका

## ता.वसई, जि.पालघर

**महानगरपालिकेच्या क्रीडा विभागासाठी क्रीडा विभागाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त राज्य शासकीय क्रीडा अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत**

**विभागाची आवश्यकता :**

१. सदर सेवानिवृत्त क्रीडा अधिकारी यांस शासकीय क्रीडा अधिकारी या पदाचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. मराठी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

**अटी व शर्ती : -**

१. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त क्रीडा अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३. क्रीडा अधिकारी पदासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात यावी.

४. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयास अनुसरुन करण्यात येणार आहे.

५. अर्जदार सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६. उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज खालील नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलिखित करावा.

७. उमेदवाराने त्यासाठी इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून सदर पदाकरिता अर्ज दिनांक ११/८/२०१७ पर्यंत मा.आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका मुख्यालय विरार, विरार (पुर्व) ता.वसई, जि.पालघर या पत्त्यावर पोहोचले अशा रितीने पोस्टाने पाठवावा. अधिक माहितीसाठी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ या दुरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दाखल घेण्यात येणार नाही.

८. नियुक्ती सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात काम करावे लागेल.

९. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी उप-आयुक्त (क्रीडा) यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना वेळोवेळी कामकाजाचा अहवाल सादर करतील.

Scanned by CamScanner

३०/प

# अर्जाचा नमुना

शासकीय क्रीडा विभागाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त राज्य शासकीय क्रीडा अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ____________________

२) अर्जदाराचा पत्ता :- ____________________

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :- ____________________

४) भ्रमणध्वनी क्रमांक :- ____________________

५) जन्म दिनांक व वय :- ____________________

६) शैक्षणिक अर्हता :- ____________________

७) अनुभव :- ____________________

८) सेवा निवृत्तीचा दिनांक :- ____________________

९) निश्चित झालेले मुळ निवृत्तीचे वेतन :- ____________________

१०) अंशराशिकृत मुल्य :- ____________________

उपरोक्त पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात / सुचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण : -

दिनांक : -

अर्जदाराची स्वाक्षरी

टिप :- अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची कागदपत्र, अनुभवाचा दाखला, निश्चित झालेले मुळ निवृत्ती वेतन, अंशराशीकरण याबाबतची कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner